भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ८४३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २७/१२/२०१६

**१) ट्रक निष्काळजीपने चालवुन दोन महीला जखमी . :—**

दिनांक २५/१२/२०१६ चे २१.०० वा.दर. फिर्यादी सौ. रेखाबाई केवळ तिपात्रे वय ४५ वर्ष रा. बोरगाव धानला हीचे सोबत भिमाबाई रामकृष्ण खोब्रागडे वय ६५ वर्ष रा. एकोडी हया रामकृष्ण मंगल कार्यालयाकडुन एनएच ६ रोड पायदळ ओलांडीत असता एनएच ६ रोड वर थांबलेल्या आरोपी ट्रक चालकाने अचानक आपल्या ताब्यातील ट्रक चालु करून फिर्यादी व तिच्या सोबत असलेली भिमाबाई यांना धडक देवुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादीचे बयान व डॉ. मेमो वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७ भादवी.सहकलम १३४(ब) मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. उईके पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**२ निष्काळजीपने वाहन चालवुन इसमास धडक मारून मरणास कारनीभुत झाल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक २६/१२/२०१६ चे १५.०० वा. दर. यातील अज्ञात आरोपी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने निष्काळजीपनाने भरधाव वेगााने चालवुन हिरो कंपनीची करिष्मा मोटार सायकल क्र. एमएच ३६ आर ४८६५ चे चालक मृतक साहील मोहीम खॉन वय २२ वर्ष रा. अंसीर वार्ड भंडारा यास धडक मारून त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने तसेच अपघाताची सुचना पोस्टेला न देता व दवाखाण्यात न नेता पळुन गेल्याने सरतर्फे फिर्यादी पाहवा बोरकर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ कलम २७९ ३०४ (अ) भादवी. सहकलम १८४,१३४/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी शेख पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलच्या धडकेत इसमास गंभीर जखमी केल्याने गुन्हा नोंद:—**

दिनांक २५/१२/२०१६ चे ११.०० वा. दर. यातील फिर्यादी दिलीप राजीराम बावणे वय ४० वर्ष रा. खैरीपट हे आपले मोटार सायकलने गवराळा येथुन परसोडी मार्गे गावी जात असतांना परसोडी गावासमोर विरूध्द दिशेने येणाऱ्या यातील अज्ञात आरोपी मोटार सायकल चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने हयगयीने व निष्काळजीपनाने चालवुन फिर्यादीचे मोटार सायकल ला धडक दिल्यान पोस्टेला कोणीतीही माहीती न देता पळुन गेला फिर्यादी रोडवर खाली पडुन उजव्या पायाच्या पोटरीच्या खाली गंभीर दुखापत व शरीराला किरकोड मार लागल्याने त्यास औषधोपचारास ग्रा. रू. लाखांदुर येथे भरती करण्यात आले जखमीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरून वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम २७९,३३८ भादवी. १३४(ब) मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा खंडाते पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**४) मारण्यापीटण्याची धमकी देउन नुकसान केल्याने गुन्हा नोंद:—**

दिनांक २५/१२/२०१६ चे १६.३० वा. दर. यातील फिर्यादी दशरथ देवराम देशमुख वय ४० वर्ष रा. नानोरी दिघोरी यांची भाची ही फिर्यादीचे घरी हजर असतांना यातील आरोपी हा फिर्यादीचे घराचे छपरीत जाऊन तुझा मामा कुठे गेला आहे असे म्हणुन मारण्यापीटण्याची धमकी देउन भिंत्तीला असलेला आरसा फोडुन नुकसान केल्याने फिर्यादीचे तोडी रिपोर्ट वरून वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४४८,४२७ ५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**५) विष प्राषन करून इसमाचा मृत्यु. :—**

दिनांक २६/१२/२०१६ चे ०४.४५ वा. दर. यातील मृतक सुभम प्रदीप गेडाम वय १८ वर्ष रा. साखळी याने आपले घरी विषारी औषध प्राषन केल्याने त्यास औषधोपचाराकरीता सु.बो. दवाखाना तुमसर येथे आनले असता तेथील डॉ. नि तपासुन मृत घोषीत केलने डॉ. मेमो वरून सरतर्फे पोहवा. धार्मीक फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १७४ जाफौ .अन्वये मर्ग दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. धार्मीक पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

६) अवैध दारू अडयांवर धाडी . :—

दिनांक २६/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. जवाहरनगर येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०१ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १० लिटर हातभट्टी दारु कि. ५०० /—रू. चा माल जप्त करण्यात आला.

७) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—

दिनांक २६/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ७८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती ०३ केसेस व ईतर वाहनांवरती ७१ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.